## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२६/२०२४ मधील निशाणी ६ वरील आदेश
## (बापुराव नामदेव पवार वि. संतोष बापुराव पवार)
## (CNR No.MHPU170022942024)

०१. सदरचा अर्ज अर्जदारांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, कलम १४४(१) अन्वये अंतरीम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. **अर्जदारांचे अर्जातील कथन खालीलप्रमाणे –**

अर्जदार क्र.१ व २ हे पती पत्नी असुन सामनेवाला क्र.१ व २ ही त्यांची मुले आहेत. अर्जदार यांना सामनेवाला क्र.१ व २ तसेच अन्य तीन मुली असुन त्या मुलींची लग्न झाली आहेत. अर्जदार यांनी त्यांच्या सर्व मुलांचे शिक्षण व लग्न करुन दिले आहे. सामनेवाला क्र.१ हा बी.कॉम. एम.बी.ए. असुन त्याच्या शिक्षणाचा रक्कम रु.२०,००,०००/– रुपयांचा खर्च अर्जदारांनी केला आहे. सामनेवाला क्र.१ हा शरयु टोयोटा, बारामती येथे नोकरीस आहे. सामनेवाला क्र.२ शिक्षित असुन तो देखील बारामती येथील सराफ दुकानात नोकरीस आहे. अर्जदार वयोवृद्ध झाले असुन त्यांना कोणताही कामधंदा होत नाही. मौजे पौंधवडी येथे असणारी शेतजमीन देखील सामनेवाला कसत असुन त्याचे उत्पन्न तेच घेत आहेत. अर्जदार राहत असलेले घर जीर्ण झाले असल्याने अर्जदार हे घराच्या बाहेर उघड्यावर राहतात. सामनेवाला क्र.२ याची पहिली पत्नी व दोन मुले ही अर्जदारांसोबत राहतात. सामनेवाला हे कोणतेही कारण नसताना अर्जदारांपासून स्वतंत्र राहत आहेत. त्यांनी अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार दिला आहे. अर्जदारांना वयोमानामुळे अनेक विकार असुन त्यांना दरमहा १०,०००/– रुपये वैद्यकीय खर्च करावा लागतो. सामनेवाला क्र.१ यास दरमहा ५०,०००/– व सामनेवाला क्र.२ यास दरमहा २०,०००/– रुपये पगार असल्याने त्या दोघांकडून दरमहा प्रत्येकी रक्कम रु.५०००/– अंतरिम पोटगी मिळावी अशी अर्जदारांनी विनंती केली आहे.

०३. **सामनेवाला क्र.१ व २ विरुद्ध विना म्हणणे आदेश पारीत करण्यात आला आहे.**

०४. अर्जदारांच्या कथनांवरुन खालील मुद्दे मी माझे विचारार्थ घेतले आहेत व त्यावरील निष्कर्ष त्या खाली दिलेल्या करणांकरीता मांडत आहे –

| अ.क्र | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अर्जदार अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय? | **होय.**<br>**दरमहा प्रत्येकी रक्कम रु.३,०००/-** |
| **२.** | आदेश काय? | **अंतिम आदेशानुसार.** |

**– का र ण मि मां सा –**

**०५.** अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एस.आय.गायकवाड यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार क्र.१ चे मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्र निशाणी ११ येथे दाखल आहे.

**मुद्दा क्र.१ करीता :-**

**०६.** प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, कलम १४४(१) नुसार दाखल असल्याने सर्वप्रथम कलम १४४ मधील अंतरिम पोटगीच्या तरतुदीचे अवलोकन करण्यात येते. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, कलम १४४ नुसार एखादया व्यक्तीकडे उदरनिर्वाहाचे साधन असूनही तो व्यक्ती त्याच्या आई-वडिलांना जे कमाविण्यास सक्षम नाहीत, त्यांना सांभाळण्यास नकार देत असेल अगर त्यांच्या उदरनिर्वाहाचा खर्च करीत नसेल तर त्याच्या आई-वडिलांना त्याच्याकडून पोटगीची रक्कम देता येते. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, कलम १४४(१) मधील तरतुदीनुसार न्यायालयास प्रथमदर्शनी जर असे दिसून आले की, एखादा व्यक्ती त्याच्या आई-वडिलांना सांभाळण्यास नकार देत आहे तर आवश्यक ठरेल इतकी रक्कम अंतरीम पोटगीची रक्कम म्हणुन न्यायालय मंजुर करु शकते.

**०७.** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, कलम १४४(१) नुसार अंतरिम पोटगी मिळण्याकरिता अर्जदारांनी हे शाबीत करणे आवश्यक आहे की,

**१.** सामनेवाला क्र.१ व २ यांचेकडे उदरनिर्वाहाचे साधन आहे,

**२.** अर्जदारांकडे उदरनिर्वाहाचे साधन नाही,

३. सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदारांना सांभाळण्यास नकार दिला आहे.

०८. अर्जदारांच्या कथनानुसार सामनेवाला क्र.१ व २ हे त्यांच्या पत्नीसोबत बारामती येथे राहतात. सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदारांसोबत राहण्यास नकार दिला असुन ते अर्जदारांची कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाहीत. प्रस्तुत प्रकरणात सामनेवाला क्र.१ व २ यांनी म्हणणे दाखल न केल्याने अर्जदारांचे अर्जातील कथन विना आव्हानित राहत आहे. तसेच अर्जदार व सामनेवाला यांच्यातील नातेसंबंध पाहता अर्जदार हे सामनेवाला यांचे आई–वडिल आहेत. कोणतेही आई–वडिल संयुक्तिक कारण नसताना स्वतःच्या मुलांविरुद्ध न्यायालयात तक्रार दाखल करणार नाहीत. त्यामुळे प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, सामनेवाला यांनी अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार दिला आहे.

०९. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, कलम १४४(१) मधील दुसरा घटक म्हणजेच अर्जदार कमावते आहेत का हे पाहणे गरजेचे आहे. या मुद्यावर अर्जदारांचे वय पाहता अर्जदार क्र.१ हे ७३ वर्षाचे असुन अर्जदार क्र.२ या ६५ वर्षाच्या आहेत. त्यामुळे वयाच्या या टप्प्यावर अर्जदार काही कमावत असतील असे गृहित धरणे देखील चुकीचे आहे. त्यामुळे अर्जदारांकडे कमावण्याचे कोणतेही साधन नाही ही बाब स्पष्ट होते. अर्जदार कमावती असल्याचे शाबीत होत नाही.

१०. अर्जदार कमावते नसल्यामुळे त्यांची मुले म्हणून त्यांचा उदरनिर्वाह करण्याची जबाबदारी सामनेवाला यांचीच आहे. कोणत्याही आई–वडिलांना त्यांच्या वृद्धापकाळात सांभाळणे व त्यांना आर्थिक मदत करणे हे त्यांच्या मुलांचे कर्तव्य व नैतिक जबाबदारी आहे. वृद्धापकाळात अशा व्यक्ती अनेक आजारांनी त्रस्त असतात व कोणताही कामधंदा करण्यास सक्षम नसतात. अशा परिस्थितीत निश्चितपणे त्यांच्या मुलांनी त्यांचे कर्तव्य बजावणे अपेक्षित आहे. अर्जदारांनी सामनेवाला यांच्या मासिक उत्पन्नाबाबत जरी कोणताही पुरावा दाखल केला नसला तरी सामनेवाला यांचे वय पाहता व त्यांच्यावर असणारी त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी पाहता ते निश्चितपणे काहीतरी कमावत आहेत असाच निष्कर्ष निघतो. त्यामुळे त्यांच्या कमाईतून त्यांनी अर्जदारांचा सांभाळ करणे अपेक्षित आहे. त्यामुळे या सर्व बाबी विचारात घेता अर्जदारांच्या उदरनिर्वाहाकरिता सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदारांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु.३०००/–

देणे योग्य ठरते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर वरीलप्रमाणे नोंदवून मुद्दा क्र.२ करिता खालील आदेश पारीत करते.

**– आ दे श –**

| | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो. |
| २. | सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदारांस दरमहा प्रत्येकी रक्कम रु.३,०००/– ( रु.तीन हजार मात्र) अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन द्यावेत. |
| ३. | अर्जदारांनी पुढील तारखेला स्वतःचा पुरावा दाखल करावा. |
| ४. | अर्ज निकाली होण्यास अर्जदारांमुळे विलंब होत असल्याचे दिसुन आल्यास अंतरीम पोटगीचा आदेश रद्द करण्यात येईल. |
| ५. | खर्चाबाबत आदेश नाही. |
| ६. | आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना मोफत देण्यात यावी. |

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.09.24 18:29:49 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि.२४/०९/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**

**ता.इंदापर, जि.पुणे.**